# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईमध्ये पोलीसांसाठी असलेल्या काही वसाहती पूर्णपणे जीर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१) ८४५६ (०६-०७-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये पोलीसांसाठी असलेल्या काही वसाहती पूर्णपणे जीर्ण झालेल्या असून अत्यंत धोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जीर्ण झालेल्या वसाहतींच्या पुर्नविकासाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०१६) :** (१) मरोळ, मुंबई येथील पोलीस वसाहतीमध्ये एकूण ४५ इमारती असून, त्यापैकी काही इमारतींची दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे.
(२) पोलीस वसाहतींच्या पुनर्विकासासाबबात कोणतीही योजना आखण्यात आलेली नसून ८ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडील भूखंडावर घरे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) ४०४५८ (२०-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे राज्यातील १७ ठिकाणी जवळपास १.९५ कोटी वर्ग फुट भूखंड राखीव असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योग्य नियोजन केल्यास राज्यातील सर्व पोलिसांना घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नियोजन करून घरे उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१६) :** (१) महामंडळास भागभांडवल म्हणून राज्य शासनाने एकूण २.१६ कोटींची चौ.फुट एवढी जागा दिलेली आहे.
(२) व (३) सदर जागेवर व पोलीस विभागाच्या उपलब्ध जागेवर पोलीसांना सोयी निवासस्थाने देण्याचे नियोजन सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात पडलेल्या दरोडाबाबत**

**(३) ४०५२४ (१७-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील टाकळी कडेवळीत श्री.बापू कोंडीबा खामकर यांच्या घरावर दिनांक २८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास सशस्त्र दरोडेखोरांनी त्यांच्या पत्नी व मुलगी यांना जबर जखमी करुन दरोडा टाकला, हे खरे आहे काय,
(२) तसेच बेलवंडी कोठार येथे दिनांक ३ जानेवारी रोजी सात ते आठ दरोडेखोरांनी दरोडा टाकून एक लाखाचा ऐवज लंपास केले असून श्रीगोंदा तालुक्यात गत १५ दिवसात पाच दरोडे टाकण्यात येवून यात ८ ते ९ व्यक्ती गंभीर जखमी झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांसंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :** (१) सदर दरोडा दिनांक २०/११/२०१५ रोजी टाकला असून त्यात अज्ञात ५ ते ६ चोरट्यांनी गज, कोडी व कोयत्याने नमूद व्यक्तीस मारहाण करून रूपये ६५,०००/- किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे.
(२) दिनांक ४/११/२०१५ रोजी बलवंडी येथील कोठार शिवार येथील अनिल रामचंद्र गाडेकर यांच्या घरी पाच ते सहा चोरट्यांनी चाकुचा धाक दाखवून काठीने मारहाण करून रूपये १,४२,०००/- किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे.
(३) या दोन्ही घटनांबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे अनुक्रमे गु.र.नं.३१७/२०१५ भा.दं.वि. कलम ३९५, ३९७, ३४२ प्रमाणे दिनांक २०/११/२०१५ रोजी व गु.र.नं. २९७/२०१५ भा.दं.वि. कलम ३९५ प्रमाणे दिनांक ०४/११/२०१५ रोजी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. गुन्हे उघड होण्याच्या दृष्टीने पोलीस स्टेशन हद्दीत वेळोवेळी नाकाबंदी गुन्हेगारी वस्तीवर छापे टाकून

कांम्बींग ऑपरेशन केले आहे. तसेच फरार आरोपीचा शोध घेण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**केळघर (ता.जावळी, जि.सातारा) येथील जुगार अड्डयावर मेढा पोलिसांनी छापा टाकल्याबाबत**

**(४) ४२५५८ (१७-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळघर (ता.जावळी, जि.सातारा) येथील बस स्थानकाजवळ अवैधपणे सुरु असलेल्या जुगार अड्डयावर मेढा पोलिसांनी छापा टाकून १२ जणांना अटक केली असून रोख रक्कमेसह २ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१६) :** (१) सदरचा छापा दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी टाकून त्यात रूपये २,०९,०९०/- चा ऐवज जप्त करण्यात आला आहे.
(२) सदर प्रकरणी मेढा पालीस ठाणे येथे गु.र.नं. २६/२०१५ मुंबई जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे एकूण १२ आरोपीवर गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपीविरूध्द दिनांक २३/०९/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयात दोषारोप पत्र पाठविले आहे. न्यायालयात गुन्हा शाबित होऊन न्यायालयाने गुन्ह्यातील आरोपींना प्रत्येकी ३००/- रूपयांचा दंड दिला आहे. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**नाशिक शहरातील तसेच लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील वाढती गुन्हेगारी व अवैध धंदे रोखण्याबाबत**

**(५) ४३०५३ (१७-०५-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील तसेच लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील वाढती गुन्हेगारी व अवैध धंदे रोखण्यासाठी पोलीस आयुक्तांनी आवश्यक कार्यवाही केली होती त्यामुळे थोडे दिवस

ही गुन्हेगारी व अवैध धंदे बंद झाले होते परंतू तद्नंतर पुन्हा सुरु झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, उक्त अवैध धंदे व गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील कचरा वेचकांसाठी सोयीसुविधा पुरविणेबाबत

**(६) ४३२७६ (१३-०५-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात सुमारे अडीच हजार कचरा वेचकांसाठी सोयीसुविधा पुरविण्यात येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कचरावेचकांसाठी सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

याबाबत कोल्हापूर शहरामध्ये “एकटी” या अशासकीय संस्थेकडे कार्यरत असणाऱ्या कचरा वेचकांना कोल्हापूर महापालिकेच्या वतीने खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

१. महिलांना कचरा संकलनासाठी घंटा गाड्या उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

२. कचरा वेचक महिलांना ओळखपत्र देण्यात आलेले आहेत.

३. कचरावेधक महिलांनी गोळा केलेल्या कचऱ्याचे विलगीकरणासाठी शहरात चार ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत तसेच त्याठिकाणी शेड उभारण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण निवड मंडळाने शिल्प निदेशक (गिरणीकार विद्युत) पदावर गैरमार्गाने निवड केल्याबाबत

**(७) ४४०५५ (०५-०५-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण निवड मंडळाने शिल्प निदेशक (गिरणीकार विद्युत) पदावर निवड केलेल्या उमेदवारांना व्यवसाय शिक्षण विभागाने गिरणीकार व्यवस्थापन (विद्युत) या पदावर व निम्न वेतनश्रेणीवर नेमणूका करुन कोकण निवड मंडळाच्या निवड आदेशाविरुध्द निर्णय घेतल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चुकीच्या पध्दतीने नेमणूक आदेश दिल्याने कर्मचाऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे, हे खरेआहे काय,

(३) असल्यास, या मंत्रीमहोदयांना दिलेल्या पत्रावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यसा, चुकीच्या पध्दतीने दिलेल्या आदेशामुळे नुकसान झालेल्या कर्मचाऱ्यांना त्याच्या पात्रतेनुसार सामावून घेण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे

भुतपूर्व निवड मंडळ कोकण भवन, नवी मुंबई यांचेमार्फत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई विभागातील पदे भरण्यासाठी दिलेल्या जाहिरातीमध्ये पद क्रमांक २ शिल्प निदेशक (गिरणीकार व विद्युत) या पदाच्या ८ जागा व त्यासाठी रु. १४००-२६०० वेतनश्रेणी दर्शविण्यात आली होती. परंतु सदर विभागामध्ये शिल्प निदेशक (गिरणीकार व विद्युत) अशा पदनामाची पदे अस्तित्वात नव्हती तर गिरणीकार व्यवस्थापन अशी पदे अस्तित्वात होती व त्यांची वेतनश्रेणी रु. १४००-२३०० अशी आहे. सदर जाहिरातीनुसार शिल्प निदेशक (गिरणीकार व विद्युत) या पदावर ६ उमेदवारांची निवड करुन शिफारस केलेली होती. त्यापैकी तत्कालीन उपसंचालकांच्या दिनांक १४.३.१९९५ च्या आदेशानुसार सध्या ३ उमेदवार गिरणीकार व्यवस्थापन या पदावर कार्यरत असून त्यांची वेतनश्रेणी रु.१४००-२३०० अशी होती. निवड झालेल्या उमेदवारांनी गिरणीकार व्यवस्थापन पदावर नियुक्तीचे आदेशाच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे व आदेशामध्ये नमुद केलेल्या संस्थेमध्ये रुजु होण्याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्याकडे प्रतिज्ञापत्र दिले आहे. त्यानुसार संबंधित उमेदवार गिरणीकार व्यवस्थापन पदावर रुजु झाले आहेत. नियुक्तीच्या वेळी सदर उमेदवारांनी कोणताही आक्षेप घेतलेला नाही व स्वेच्छेने नियुक्ती स्विकारत असल्याबाबत हमीपत्र लिहुन दिले आहे.

(३) गिरणीकार व्यवस्थापन या पदावर कार्यरत असलेल्या ३ कर्मचाऱ्यांना शिल्प निर्देशक (विजतंत्री) या पदावर समायोजित करण्यांबाबतचा प्रस्ताव विभागामार्फत सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आला असता, सामान्य प्रशासन विभाग व वित

विभागाने सदरहु प्रस्ताव मान्य करता येत नसल्याचे कळविले आहे. सदर वस्तुस्थिती संबंधित वि.स.स यांना कळविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहरातील वाढते अपघातसंदर्भात विशेष मोहिम राबविण्यास तसेच त्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(८) ४४०८६ (२८-०४-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात ५७ टक्के अपघात पादचारी रस्ता ओलांडताना तर २५ टक्के अपघात दुचाकीस्वारांच्या होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ वा त्यादरम्यान झालेल्या वाहतुक सुरक्षा सप्ताहाविषयक एका विशेष बैठकीत निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील वाढते अपघातसंदर्भात विशेष मोहिम राबविण्यास तसेच त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१६) :** (१) सन २०१५ मध्ये मुंबई शहर व उपनगरांमध्ये एकूण ३८३३ अपघात झाले असून त्यामध्ये ६११ जणांचा मृत्यू, २४८२ गंभीर जखमी व १,५४७ किरकोळ जखमी झाले आहेत. या अपघातांमध्ये ३४२ पादचा-यांचा मृत्यू झाला असून १२९० गंभीर जखमी तर ५४३ किरकोळ जखमी झाले आहेत. हे प्रमाण ५५.९७ टक्के आहे. तसेच २०८ दुचाकीस्वरांचा अपघातांमध्ये मृत्यू झाला असून हे प्रमाण ३४.४ टक्के एवढे आहे.
(२) मुंबई शहर व उपनगरांमधील अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे,
१. मुंबई वाहतुक शाखेच्या शिक्षण विभागामार्फत ५०५ शाळांमधील ६२०० विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा दलाच्या माध्यमातून प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात येत आहे.
२. वाहतुक चिल्डर्न पार्क, वाहतुक मोबाईल पार्कमार्फत शालेय विद्यार्थी व यांचा पालकांना प्रशिक्षण देण्यात येते.
३. दरवर्षी पवई येथे निवासी शिबीर आयोजित करण्यात येऊन महानगरपालिकेचे विद्यार्थी व शिक्षकांना रस्ता सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण देण्यात येते.
४. रस्ता सुरक्षा अभियानादरम्यान रस्ता सुरक्षितता, वाहतुक नियंमाबाबत जनजागृती मोहित राबविण्यात येते. विविध शिबरे, व्याख्याने आयोजित करण्यात येतात.
५. विविध महाविद्यालय/शाळांमध्ये रस्ता सुरक्षा विषयी व्याख्याने आयोजित करण्यात येतात.
६. सन २०१६ मध्ये वाहतुक नियमांचे उल्लंघन करणा-या ६,००,३८४ जणांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

७. नागरिकांनी वाहतुक नियमांचे उल्लंघन करुन नये याकरिता कसुरदार वाहन चालकांचे समुपदेशन केले जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवगांव (ता.निफाड, जि.नाशिक) येथे मनीषा चोपडे हिचा**
**मृतदेह जळालेल्या अवस्थेत सापडल्याबाबत**

**(९) ४७३०० (२४-०५-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवगांव (ता.निफाड, जि.नाशिक) येथे दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी मनीषा चोपडे (वय १७) हिचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत सापडलेला असून घातपात झाल्याचा संशय असतानाही पोलीस योग्य दिशेने तपास करीत नसल्याच्या निषेधार्थ सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात येऊन बंद पाळण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन योग्य तपास लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मृत्यूबाबत अज्ञात आरोपींविरूध्द लासलगांव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २/२०१६, भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये दिनांक ०६/०१/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा नाशिक ग्रामीण यांच्याकडे देण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहर वाहतुकीची कोंडी होत असल्याने सिग्नल बसविण्याबाबत**

**(१०) ४८२१६ (२८-०४-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात वाहतुकीची कोंडी होत असल्याने वाहतूक पोलीस प्रशासनाने गेल्यावर्षी २२ ठिकाणी सिग्नल बसविण्याची यादी पोलीस प्रशासनाने दिली असता केवळ एकाच ठिकाणी सिग्नल बसविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुणे शहरात वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१) पुणे महानगरपलिका आणि वाहतूक पोलीस नियंत्रण शाखा यांच्या संयुक्त सहमतीने शहरांमधील १६ चौकांमध्ये प्रधान्याने सिग्नल उभारण्याची यादी तयार करण्यात आली होती.

(२) व (३) पुणे महानगरपालिकेकडून सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकात उपलब्ध करण्यात आलेल्या तरतुदींनुसार १२ चौकांमध्ये सिग्नल उभारण्यात आले असून सदर सिग्नल कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. तसेच पुणे शहरातील वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. वाहतूक शाखेने नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांविरूध्द सन २०१६ मध्ये १५ जून अखेर ६,९५,९९० केसेस करून त्यांच्याकडून रूपये ७,२०,७६,८५०/- एवढा दंड वसूल केला आहे.

२. पुणे शहरातील १० महत्वांच्या रस्त्यांवर सिग्नलचे सिंक्रोनायझेशन करण्यात आले आहे.

३. विना अडथळा वाहतूक चालण्याकरिता ५० ठिकाणी उजवे वळण बंद करण्यात आले आहे. तसेच अवजड वाहनांना १७० रस्त्यांवर प्रवेश बंदी, १२५ ठिकाणी नो-एंट्री, ४३ ठिकाणी एकेरी वाहतूक, ३२० ठिकाणी नो-पार्किंग केले आहे.

४.वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या इलेक्ट्रिक पोल, डिपी. यांचे स्थलांतर करणे, रेलिंग दुरूस्त करणे, स्टील बोलार्ड बसविणे ड्रेनेज लाईन दुरूस्ती, नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, अनावश्यक डीव्हायंडर काढणे, रस्त्यावर आवश्यक ठिकाणी डिव्हाईडर बसविणे, इ.बाबत पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर सादर केले आहेत.

५. उड्डाणपूलांची कामे सुरू असलेल्या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कामगार विभागामार्फत असंघटीत कामगारांचे जिवनमान उंचविण्यासाठी असलेल्या योजनेपासून कामगार वंचीत असल्याबाबत**

**(११) ४९२१६ (१६-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या कामगार विभागामार्फत असंघटीत कामगारांचे जीवनमान उंचविण्यासाठी विविध कल्याणकारी योजना सुरु करण्यांत आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा व मोताळा (जिल्हा बुलडाणा) तालुक्यातील एकूण असंघटीत बांधकाम कामगारांच्या करण्यांत आलेल्या नोंदी तसेच एकूण किती कामगारांना आरोग्य व अपघात विमा योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे,

(३) असल्यास, कामगारांना उक्त कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (१५-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत बुलढाणा जिल्हामध्ये एकूण ३५६४ बांधकाम कामगार नोंदीत असून या पैकी बुलढाणा व मोताळा तालुक्यात १८०४ बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

सदर दोन्ही शहरातून कोणत्याही नोंदित बांधकाम कामगारांचे आरोग्य विमा योजनेचा लाभ घेतलेला नाही. तसेच, सन २०१४-१५ या वर्षामध्ये मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अपघात विमा काढण्यात आलेला नव्हता.
(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळतील नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांना राज्य शासनाच्या “महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना” या योजनेमध्ये समाविष्ट करुन घेऊन आरोग्य विमा योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या शिवस्मारकास होत असलेल्या विलंबाबाबत

**(१२) ५३५५४ (०१-०७-२०१३). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या शिवस्मारकासाठी समिती पुनर्गठीत केली असूनही स्मारकाच्या कामाची प्रगती झाली नसून एका वर्षात शासनामार्फत ९ शासकीय निर्णय काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच स्मारकाच्या प्रोजेक्ट ऑफिसकरिता वर्षभरात १ कोटी १० लाख रुपये देण्यात आले असूनही स्मारकासाठी १ रुपयाचीही तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मारकाच्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच सदर काम तातडीने सुरु करुन ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०७-२०१६) :** (१) दिनांक १ जुलै, २०१५ ते ३० जून, २०१६ या कालावधीत एकूण ११ शासन निर्णय काढण्यात आले आहेत. स्मारकासाठी आवश्यक त्या परवानग्या प्राप्त केल्यानंतर निविदा मंजूरीनुसार दिनांक ३० मार्च, २०१६ च्या आदेशान्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून प्रकल्प व्यवस्थान सल्लागारास प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ४० महिने इतका कालावधी विहीत करण्यात आला आहे.
(२) स्मारकाच्या प्रकल्प ऑफिस व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेसाठी एकूण रु.५,२३,६१,८४४/- इतका निधी सन २०१५-१६ आर्थिक वर्षात देण्यात आलेला आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता प्रस्तुत स्मारकासाठी रु.१०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराला स्मारकासाठी विहित करण्यात आलेल्या मुदतीत प्रकल्प पूर्ण करण्यास शासन प्रयत्नशिल आहे.

---

**चाकण पोलीस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत वेश्या व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(१३) ५३६३५ (२३-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (जि.पुणे) पोलीस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृतरित्या वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेश्या व्यवसाय करणाऱ्या द्वारका सिटी रेसिडेन्सी, म्हाळुंगे येथील घरावर दिनांक २७ एपिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास सहाय्यक पोलिस निरीक्षक यांनी धाड टाकली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या सेवेत असणाऱ्या व जात प्रमाणपत्र वैधता सिध्द न करु शकलेल्या कोळी जमातीच्या कर्मचाऱ्यांना सेवेतून न काढण्याबाबत**

**(१४) ५३६३८ (२२-०७-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत असणाऱ्या व जात प्रमाणपत्र वैधता सिध्द न करु शकलेल्या कोळी जमातीच्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेतून काढण्यात येवू नये असे आश्वासन मा. मुख्यमंत्री यांनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :** (१), (२) व (३) दिनांक १५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण देण्याबाबतच्या मागणीचा विचार करण्यासाठी दिनांक ४.३.२०११ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या मंत्रीगटाच्या

अहवालासंदर्भात शासनाचा पुढील निर्णय होईपर्यंत दिनांक १५.६.१९९५ नंतर दिनांक १७.१०.२००१ पर्यंत या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केलेले नाही. अशा कर्मचाऱ्याना शासन सेवेतून निलंबित करण्यात येऊ नये अथवा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नये असा निर्णय दिनांक २१.१०.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये घेण्यात आला आहे.

दिनांक २१.१०.२०१५ या शासन परिपत्रकाविरूध्द मा.उच्च न्यायालय मुंबई, खडपीठ, नागपूर येथे रिट याचिका, क्र.६२४७/२०१५ दाखल केली आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक २५.४.२०१६ च्या आदेशान्वये या परिपत्रकास स्थगिती दिलेली आहे.

---

**दिघी सागरी पोलिस ठाण्याच्या (जि.रायगड) हद्दीमध्ये आदगाव व सर्वे या दोन गावांमध्ये एकाच रात्री १२ घरफोडया झाल्याबाबत**

**(१५) ५३७५७ (२३-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघी सागरी पोलिस ठाण्याच्या (जि.रायगड) हद्दीमध्ये आदगाव व सर्वे या दोन गावांमध्ये दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी वा सुमारास एकाच रात्री १२ घरफोडया झाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये आदगाव व सर्वे या दोन गावामध्ये दिनांक ७/४/२०१६ रोजी एकूण ११ घरफोडीच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) सदर प्रकरणी फिर्यादी व इतर साक्षीदार असे एकूण ११ जणांच्या घरांची घरफोडी करून रुपये २,७७,५००/- चा माल चोरुन नेल्यामुळे दिघी सागरी पोलीस ठाणे, ता.श्रीवर्धन.जि.रायगड येथे चार आरोपीविरुध्द गु.र.नं. २८/२०१६ भांदविसं. कलम ४५७, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एका आरोपीस अटक करण्यात आले असून उर्वरित तीन आरोपी फरार आहेत. गुन्ह्यातील आरोपी कडून किंमत रु.२००/- किंमतीचे चांदीचे पैजणाचा जोड असा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीत याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या नागरीकांसंदर्भातील**
**१५७१ खटले न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ५३८३० (२३-०८-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या नागरीकांसंदर्भातील सुमारे १५७१ खटले न्यायालयात प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खटले निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :** (१) माहे एप्रिल, २०१६ अखेर राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या नागरीकांसंदर्भातील सुमारे १५७१ खटले न्यायालयात प्रलंबित नसून ४६२२ खटले न्यायालयात प्रलंबित होते.

(२) व (३) अशा प्रकारचे खटले निकाली काढण्यासाठी विधि व न्याय विभागाच्या दिनांक ०५.०७.२०१६ च्या अधिसूचनेन्वये राज्यातील २६ जिल्ह्यातील सत्र न्यायालयांना अनुसूचित जाती/जमाती (अ.प्र.) कायद्यांतर्गत दाखल प्रकरणे चालविण्यासाठी विशेष न्यायालय म्हणून विनिर्दिष्टित केले आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १७.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक महसुली विभागात एक याप्रमाणे ६ अनन्य विशेष न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यातील ठाणे, नागपूर व औरंगाबाद येथील न्यायालये कार्यरत असून उर्वरित ठिकाणी न्यायालये कार्यरत करण्याची बाब विचाराधीन आहे.

---

**मुंबईतील दादर येथील बे-वॉच बार मालकाने वृध्द महिलेच्या घराला**
**आग लावून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत**

**(१७) ५४०८४ (२३-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील बे-वॉच बार मालकाने बारच्या मागील बाजूस असलेल्या अब्दुल गफार चाळीतील लक्ष्मी निरेटी या वृध्द महिलेच्या घराला दिनांक २ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास आग लावून जीवे मारण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणाची चौकशी केली असता चौकशीमध्ये फायर ब्रिगेड व कार्यकारी अभियंता (विद्युत), बेस्ट प्रशासन यांचेकडून करण्यात आलेल्या तपासणीत सदरची आग ही बे-वॉच हॉटेल बार आस्थापना मालकाने लावली नसून ती शॉर्ट सर्किटमुळ लागली असल्याचे निष्पन्न झालेआहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात तसेच मुंबईतील न्याय दंडाधिकारी न्यायालयातील मा.न्यायमूर्तीची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१८) ५४१९३ (२३-०८-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा व कनिष्ठ न्यायाधीशांची ५१७ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील न्याय दंडाधिकारी न्यायालयात ३ लाख ३८ हजार खटले प्रलंबित असल्याचे नॅशनल ज्युडीशियल डेटा ग्रीड - एन जे डी जी च्या आकडेवारीनुसार निदर्शनास आले असून दिवाणी कोर्टात तसेच मुंबई सिटी सिव्हील कोर्टात ८२ हजार खटले प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. न्यायमुर्तीच्या अपुऱ्या संख्येमुळे हजारो खटले अनेक वर्षापासून प्रलंबित असून सदर खटले निकाली काढण्यासाठी रिक्त असलेली मा.न्यायमूर्तीची पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रत्यक्षात मुंबईतील न्याय दंडाधिकारी न्यायालयात ३,५६,३६२ तथा मुंबई सिटी सिव्हील कोर्टात ७८,४०५ खटले प्रलंबित आहेत.

(३) सन २०१५ पासून आतापर्यंत दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांची ४७७ पदे भरण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कामठी (जि. नागपूर) येथील विद्यार्थीने छेडछाडीमुळे आत्महत्या केल्याबाबत**

**(१९) ५४३७३ (२३-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामठी (जि. नागपूर) येथील दहावीच्या विद्यार्थीने गुंडांच्या छेडछाडीमुळे आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच अतिप्रसंगाला विरोध करताना कांद्री (ता.रामटेक) येथील १४ वर्षीय मुलीच्या हाताची दोन बोटे कापल्याचे दिनांक २३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू दोन्ही घटनांप्रकरणी पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच भविष्य असे गैरप्रकार होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) पोलीस स्टेशन नवीन कामठी, नागपूर शहर कार्यक्षेत्रात मृताकच्या भावाच्या तोंडी रीपोर्टवरुन पोलीस स्टेशन नवीन कामठी मर्ग क्र. १७/२०१६ कलम १७४ जा.फौ. अन्वये दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासात मृतकाची बहीण, आई व इतर नातेवाईक यांनी दोन आरोपींनी मृतकला टाँटींग करीत, रस्त्यात आडवे होत होते. त्यांच्या त्रासाला कंटाळून गळफास घेवून आत्महत्या केली असे बयाणात सांगितले. सदर बयाणवरुन पोलीस स्टेशन नवीन कामठी अपराध क्र. १३३/२०१६ कलम ३०६, ३४५ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुनह्यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. उपाययोजना म्हणून नागपूर शहरात, पेट्रोलिंग व्हॅन लावण्यात आली आहे. ॲप आय वॉच पोलीस सुरु करण्यात आले. नागरीकांच्या सोयीसाठी व्हॉटस ॲप ग्रुप तयार करण्यात आले असून, पोलीस नियंत्रण कक्षामार्फत नियंत्रण करण्यात येते.

पोलीस स्टेशन रामटके, नागपूर ग्रामीण कार्यक्षेत्रात कांद्री येथील फिर्यादीची मुलगी प्रातविधीनंतर परत येताना आरोपीने तीचा हात घरुन चालण्यास सांगितले त्यास नकार दिल्याने आरोनीने धारधार शस्त्राने तिच्या गळ्यावर, माणेवर, गालावर व दोन्ही हातावर वार करुन ठार मारण्याच्या प्रयत्न केला. तीच्या उजव्या हाताचा बोट कटला सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, रामटेक येथे अप. क्र. १४३/१६ कलम ३०७, ३५४ भादंवि सह कलम १० लैंगिक अप.बा.सं.कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. असे गैरप्रकार होऊ नये म्हणून महिला पोलीस पेट्रोलिंग व पोलीस मित्राचा मदतीने गस्त लावण्यात आले आहे. महिला दक्षता समिती व इतर नागरीकांचा मिटींग घेण्यात येते. गावांना भेटी देवून गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील विक्रोळीच्या टागोरनगर जंक्शन येथे अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आल्याबाबत**

**(२०) ५४५०० (२३-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांची अंमली पदार्थ विरोधी शाखा आणि केंद्र सरकारच्या अंमली पदार्थ नियंत्रण शाखेने संयुक्तपणे केलेल्या कारवाईत विक्रोळीच्या टागोरनगर जंक्शन येथे एका कार मधून तीन तस्करांकडून १ हजार ९०० ग्रॅमचा सुमारे ३८ लाख रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आल्याचे दिनांक ८ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तपासात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. त्यांच्याकडून एकूण १९०० ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.) (किंमत सुमारे रु. ३८ लाख) जप्त करण्यात आला व गुन्ह्यात वापरलेली हुंडाई गेट्झ या कंपनीची मोटार कार क्र. एमएच-०२-पीऒ-७१८८ व रोख रुक्कम रु. २२००/- ही जप्त करण्यात आली आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष गुन्हा रजि.क्र. ५९/ २०१६ कलम ८ (क) सह २२ (क) २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून सर्व आरोपी अद्यापपर्यंत न्यायालयीन कोठडीत बंद आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर राजर्षी शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत**

**(२१) ५४५८५ (२३-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर राजर्षी शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी राज्य शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,

(२) तसेच स्मारकाच्या उभारणीसाठी पहिल्या टप्प्याच्या कामाकरिता निधी सार्व.बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राजर्षी शाहू महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे व कामाचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :** (१), (२) व (३) प्रस्तावित स्मारकाची जागा वस्त्रोद्योग महामंडळाकडून अद्यापी उपलब्ध झालेली नाही. दरम्यान स्मारकाच्या पहिल्या टप्प्याच्या कामाच्या अंदाजपत्रकाची छाननी चालू आहे. या सद्य:स्थितीच्या अनुषंगाने सद्या रू.१०.०० लक्ष एवढी लाक्षणिक तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

---

**अकुलखेडा (ता. चोपडा, जि.जळगाव) येथील विधवा महिलेवर अत्याचार करण्यात आल्याबाबत**

**(२२) ५४७४० (२३-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकुलखेडा (ता.चोपडा, जि.जळगाव) येथील एक विधवा महिला रात्री गुरांना चारा टाकण्यासाठी जात असतांना एका नराधमाने तिच्या एकटेपणाचा फायदा घेऊन विळ्याचा धाक दाखवून शेतात नेऊन बलात्कार केल्याचे तसेच अंगावरील सोन्या चांदीचे दागीन्यासह मोबाईल पळविला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१६) :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी पिडीत महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन दि.२३.५.२०१६ रोजी चोपडा शहर पोलीस स्टेशन येथे भाग-५ गु.र.क्र.८८/२०१६ भादंवि कलम ३७६(१), ३९२, ३५४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे न्यायाययीन इमारतीचे बांधकामासाठी निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत**

**(२३) ५५५०७ (२३-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सावली येथे न्यायालयाचे कामकाज फार वर्षापासून भाडयाच्या खोलीमध्ये सुरू असल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत असून सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी सावली येथे नविन न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे दिंनाक १३ ऑगस्ट, २०१४ च्या सुमारास सादर केले असता सदर प्रस्तावामध्ये त्रुटी काढून मंजूरीविना सदर प्रस्ताव गत दोन वर्षापासून प्रलंबित ठेवण्यात आले असल्याचे माहे ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावली येथे न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देवून निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :** (१) नाही सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) सावली, जि.चंद्रपूर येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव रू.५.०० कोटीपेक्षा अधिक खर्चाचा असल्याने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीसमोर सादर करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळवाडी नं.१ (जि.पुणे) गावाच्या हद्दीत वाळूचोरी प्रकरणी**
**तिन जणांना अटक करण्यात आल्याबाबत**

**(२४) ५५७०४ (२३-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळवाडी नं.१ (जि.पुणे) गावाच्या हद्दीत पडस्थळ इंदापूर रस्त्यावर वाळूचोरी प्रकरणी तिन जणांना अटक करण्यात आले असून दोन ट्रक व कारसह १७ लाख ४५ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी इंदापूर पोलीस स्टेशन येथे १) गु.र.नं.१७६/२०१६ भादंवि कलम ३७९, ३४ व २) गु.र.नं.१७७/२०१६ भादंवि कलम ३७९, ३४ अन्वये दोन गुन्हे दाखल असून दोन्ही गुन्ह्यामध्ये ३ आरोपींना अटककरुन त्यांचेकडून दोन ट्रक, एक कार असा एकूण १७,४५,०००/- रु. चा लाम जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दोन्ही गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबीगांव (जि.पुणे ता.मावळ) येथील एका लॉजवर छापा टाकून**
**सेक्स रॅकेटचा तपास लावल्याबाबत**

**(२५) ५५७३८ (२३-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबीगांव (जि.पुणे, ता.मावळ) येथील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका लॉजवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक (एएचटीयू) कक्षाने छापा टाकून सेक्स रॅकेटचा तपास लावला असुन या लॉजवरुन ८ सज्ञान मुलीची व ३ बांगलादेशी मुलीची सुटका केली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरिल प्रकरणी चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय.
(२) प्रस्तुत प्रकरणी दोन आरोपी यांनी परराज्यातील पिडीत महिलांना वेश्या व्यवसायाकरिता प्रवृत करुन त्यांच्या वेश्या व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नावर उपजिवीका भागवित असताना मिळून आल्याबाबत सहायक पोलीस निरीक्षक, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन भाग ६ गु.र.नं. ३४/२०१६ अनैतिक मानवी व्यापार (प्रतिबंधक) अधिनियम कायदा कलम ३, ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीत महिलांनामुक्त करुन रिस्क्यु फौंडेशन, हडपसर, पुणे येथे दाखल करण्यात आले.

गुन्हयातील आरोपी क्र. २ यास अटक करण्यात आले आहे. आरोपी क्र. १ याने अटक पूर्व जामीनासाठी मा.न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्याचा अर्ज नामंजूर झाल्यापासून तो त्याचे अस्तित्व लपवून असून तो मिळून आला नाही. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील धर्मादाय रुग्णालयात गरीब रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवण्याबाबत तपासणी करण्यासाठी स्वतंत्र पथक स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत

**(२६) ५५८०९ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील धर्मादाय रुग्णालयात गरीब रुग्णांसाठी नियमानुसार राखीव खाटा ठेवल्या जातात की नाही तसेच उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी खर्च केला जातो की नाही याची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र पथक स्थापन करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई कोपरखैरणे येथील सिडकोच्या मनमानी कारभारास कंटाळून स्वराज बिल्डरचे संचालक यांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(२७) ५६३०० (२३-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई कोपरखैरणे येथील स्वराज बिल्डरचे संचालक यांनी सिडकोच्या मनमानी कारभाराला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना घडल्याचे माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१६) :** (१) व (२) स्वराज्य बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स वाशी, नवी मुंबई चे संचालक यांनी त्यांचा आत्येभाऊ याचेवर विश्वासाने व्यवसायाची जबाबदारी सोपविली होती, आरोपीने मयत इसमाचा फायदा घेऊन त्यांना प्रचंड आर्थिक संकटात आणले व कर्जबाजारी केले. यामुळे मयत इसमाचा व्यवसाय उध्वस्त होऊन त्या सर्वांचा मानसिक तणाव आल्याने आत्महत्या केली आहे.
(३) सदर प्रकरणी सानपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६१/२०१६ भा.दं.वि. कलम, ३०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आलेली असून अटक आरोपी जामिनावर मुक्त आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

---

**मुंबईतील मुख्य बंदर अधिका-यास लाच स्विकारताना झालेली अटक**

**(२८) ५६३४५ (२३-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुख्य बंदर अधिकारी यांना बीचवर जलक्रिडा उपक्रम सुरु करण्यासाठी ३५ हजार रुपयाची लाचेची रक्कम स्विकारताना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्सार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) होय,
(२) व (३) कोस्टगार्ड विभाग भारत सरकारच्या सेवेतील व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामध्ये सागरी सुरक्षा व संरक्षण अधिकारी पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेले कमांडंट अरूण वासुदेवे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रायगड, अलिबाग येथील सापळा पथकाकडून दिनांक ११/०५/२०१६ रोजी रंगेहाथ पकडण्यात आल्यानंतर त्यांची या विभागातील सेवा दिनांक ११/०५/२०१६ पासून कोस्टगार्ड विभागात प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे. कोस्टगार्ड विभाग, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक ३१/०५/२०१६ रोजीच्या आदेशान्वये त्यांना दिनांक ११/०५/२०१६ ते दिनांक १६/०५/२०१६ पर्यंत निलंबित ठेवण्यात आलेले होते. आणि दिनांक १७/०५/२०१६ पासून सेवेत पुन:स्थापित करण्यात आलेले आहे. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडून नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास अद्याप सुरू आहे.

---

**चिपळुण (जि.रत्नागिरी) तालुका कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्षाचे**
**अपहरण करुन मारहाण करण्यात आल्याबाबत**

**(२९) ५७०२८ (२३-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळुण (जि.रत्नागिरी) तालुका कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री.संदीप सावंत यांना दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी त्यांच्या घरातून जबरदस्तीने अपहरण करून त्यांना माजी खासदार व त्यांच्या साथीदारांनी मुंबईमध्ये बेदम मारहाण केल्याची तक्रार श्री.सावंत व त्यांच्या नातेवाईकांनी पोलीसात नोंदविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी ठाणे नगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.०/१६ भा.द.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२३,३२४, ३४१, ३४२, ३६३, ४५२, ५०४,५०६ अन्वयेदाखल करुन पुढील तपासासाठी कागदपत्रे चिपळूण पोलीस ठाण्यात पाठविण्यात आल्याने चिपळून पोलीस ठाणे भाग १ ते ५ गु. र. नं. ८६/१६ भा.द.वि. कलम३६३, ३६५, ३६८, ४५२, २०१, १४३, १४७, १४८, १४९,३२३,

३२४, ३४१, ३४२, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखलकरण्यात आला आहे. सदर प्रकरणी ५ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत. मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मालवणी मालाड (प) येथील डंम्पिंग स्टेशन येथून पोलीसांनी गांजा जप्त केल्याबाबत**

**(३०) ५८०२७ (२४-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवणी मालाड (प) मुंबई महानगरपालिकेच्या डंम्पिंग स्टेशन येथून दिनांक ८ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास मालवणी पोलीसांनी २७ किलो गांजा जप्त केला असून त्याची किंमत ३२ लाख ७० हजार एवढी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मालवणी पोलीस स्टेशनमध्ये अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
अंमली पदार्थ विरोधी कक्ष, कांदीवली युनिट गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३/१६ कलम ८(क) सह २०(ब) २९ एनडीपीएस ॲक्ट १९८५ अन्वये नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्यात १ पुरुष, २ महिला असे एकूण तीन आरोपींना अटक करुन एकूण २७ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजित किंमत रुपये २,७०,०००/- अशी आहे. सदरचे ठिकाण कच्चा रोड, बस क्र. २०७ चा लास्ट बस स्टॉप महानगरपालिका उदंचन कैंद्र मालवणी मालाड मुंबई असे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दादर येथे पोलीस हवालदारास बेदम मारहाण करण्यात आल्याबाबत**

**(३१) ५८०५० (२३-०८-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी पार्क पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले श्री.गजानन चव्हाण या पोलिस शिपायाला दिनांक ९ मे, २०१६ रोजी गणवेशात असतांना दादर, मुंबई येथील शिवसेना भवन समोरील पेट्रोल पंपावर तीन तरुण एका टॅक्सीवाल्यांबरोबर वाद घालत असताना मध्यस्थी करण्यासाठी गेले असता त्यांना बेदम मारहान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित मारेकऱ्यांविरुध्द शिवाजी पार्क पोलिसांनी विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत काही महिन्यांत भररस्त्यात पोलिसांवर हल्ले होण्याच्या प्रकारात लक्षणीय वाढ झाली असून सदर प्रकाराला तातडीने आळा घालण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,
(४) तसेच उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात (माहे जानेवारी ते ऑगस्ट) सन-२०१६ मध्ये पोलीसांवर झालेल्या हल्ल्याबाबत एकूण २०४ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी १९० गुन्हे उघड झाले आहेत. याबाबत एकूण ३२४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील मोहल्ला कमिटी, महिला दक्षता कमिटी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी तसेच इतर व्यावसायिकांच्या वेळोवेळी सभा आयोजित करून पोलीस त्यांचे कायदेशीर कर्तव्य पार पडत असताना त्यांना कोणत्याही प्रकारे अडथळा आणून वाद निर्माण करण्यात येऊ नयेत, नागरिकांनी शिस्त पाळून कायद्याचा आदर करावा, पोलीसांवर हल्ले करून नयेत याकरिता लोकांचे प्रबोधन करण्यात येते. पोलीस ठाणेस कार्यरत असलेले सर्व अधिकारी व अंमलदारांना आपले कर्तव्य बजावित असताना नागरिकांशी सलोख्याने वागण्याबाबत तसेच अटीतटीची परिस्थिती उद्भवण्या अगोदरच त्यावर प्रभावीपणे परिस्थिती नियंत्रणात आणण्याबाबत पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या मार्फत सूचना देण्यात आल्या आहेत, यानंतरही जर पोलीसांवर हल्ला झाला तर अशा प्रकरणात कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येऊन सखोल चौकशीअंती योग्य व सबळ पुराव्यानिशी गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात येते. तसेच असे हल्ले करणाऱ्या गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई सुध्दा केली जाते.
(४) सदर प्रकरणी शिवाजी पार्क येथे गु.र.क्र. १५६/२०१६ भा.दं.वि. कलम, ३५३,३३२, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून अटक आरोपी जामिनावर मुक्त आहे. गुन्ह्याची चौकशी पूर्ण झाली असून दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भारतरत्न लता मंगेशकर आणि सचिन तेंडुलकर यांच्यावरील आक्षेपार्ह व्हिडीओ तन्मय भट्ट याने फेसबुक पेजवर टाकल्याबाबत

**(३२) ५८७७६ (२३-०८-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न लता मंगेशकर आणि सचिन तेंडुलकर यांच्यावर आक्षेपार्ह टिपणी करणाराए व्हिडीओ एआयबी चे तन्मय भट्ट याने फेसबुक पेजवर टाकला असून व्हिडीओतील संवाद अत्यंत आक्षेपार्ह आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१६) :** (१) होय,
(२) प्रस्तुत प्रकरणी Facebook, Twitter व Google (You tube) या सोशल मिडीया साईट्सशी पत्रव्यवहार करण्यात आला व ज्या आयपी ॲड्रेस वरून व्हिडीओ प्रसारीत करण्यात आला, त्याची विचारणा करण्यात आली व त्याअनुषंगाने सदरच्या लिंक बंद करण्यात आल्या.
तसेच सदर प्रकरणाबाबत तक्रारदारांना सायबर पोलीस ठाणेस समक्ष येऊन गुन्हा नोंद करणेकामी वारंवार संपर्क साधला असता त्यांनी असमर्थता दर्शविली असल्यामुळे सदर प्रकरणी पुढील कारवाई करणे शक्य झाले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली येथील निळजे येथे पाळणाघरात मुलीचे लैगिक शोषण झाल्याबाबत**

**(३३) ५९४८३ (२३-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली येथील कल्याण - शीळ मार्गावरील निळजे गावातील चंद्रेश व्हीला इमारतीमधील पाळणाघरात दीपक हेरोळे या इसमाने ११ वर्षाच्या मुलीचे लैगिक शोषण झाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय.
(२) आरोपीने पिडीत मुलीवर लैंगिक अत्याचार केलेबाबत मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले असून, पिडीत मुलीने दिलेल्या फिर्यादीवरुन मानपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं.I२६६/२०१६ भादंवि कलम ३७६, २(i) (i) पोस्को ॲ. ४, ८, १२ प्रमाणे दि. १८.५.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभुळगांव (जि. यवतमाळ) तालुक्यात लुटमार व घरफोडी होत असल्याबाबत**

**(३४) ५९५२० (२३-०८-२०१६). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) तालुक्यात लुटमारी व घरफोडी अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे गत ६ महिन्यापासून घडत असून पोलीस तपासामध्ये विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) बाभुळगाव तालुक्यातील मागील ६ महिन्यात लुटमारीचे (जबरी चोरी) दोन गुन्हे व घरफोडीचे तीन गुन्हे घडले असून सर्व पाचही प्रकरणात वेळीच गुन्हे नोंदवून तपास करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी लुटमारीचे दोन घटनांबाबत पोलीस स्टेशन, बाभुळगाव येथे गु.र.क्र.८२/१६ कलम ३९४ भादंवि अन्वये व गु.र.क्र.१२३/१६ कलम ३९२ भादंवि अन्वये दोन्ह गुन्हे नोंदवून तपास करण्यात आला आहे. उपरोक्त नमुद गु.र.क्र.१२३/१६ मध्ये २ आरोपींना अट करण्यात आली आहे. तर गु.र.क्र.८२/१६ मधील आरोपी अज्ञा असून आरोपींना शोध घेणे सुरु आहे.

तसेच घरफोडीचे तीन घटनांबाबत पोलीस स्टेशन, बाभुळगाव येथे (१) गु.र.क्र.४/१६ कलम ४५७, ३८०, ४२७, ५११ भादंवि (२) गु.र.क्र.१८५/१६ कलम ४५७, ३८० भादंवि (३) गु.र.क्र.२०१/१६ कलम ४५७, ३८० भादंवि प्रमाणे वेळीच ३ गुन्हे नोंदवून तपास करण्यात आला आहे. सदर ३ घरफोडीच्या गुन्हयापैकी एका गुन्हयारत आरोपीस अटक करुन त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे तर उर्वरित दोन गुन्हे तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भावठाणा (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे दलितांवर सामुहिक बहिष्कार घालण्यात आल्याबाबत**

**(३५) ५९९९४ (२३-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भावठाणा (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे दलित सवर्ण यांच्यात झालेल्या वादाचे पर्यावसन दलितांवर सामुहिक बहिष्कार घालण्यात आला असून दलितांना पिण्याचे पाणी व दळण देण्यास मनाई करण्यात आली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दलितांवर बहिष्कार टाकणाऱ्या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०१६) :** (१) व (२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींवर पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण गुरनं. ३१/२०१६ कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२३, २९५, ५०४, ५०६ भादंवि सह कलम ३(१)(१०) अ.जा.ज./अ.प्र.का.१९८९ अन्वये गुन्हा दि. २७.०४.२०१६ रोजी दाखल करण्यात आला असून आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केला आहे व सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) बस स्थानकात राज्य परिवहन महामंडळाच्या वाहकाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबाबत**

**(३६) ६०१२३ (२४-०८-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) बस स्थानकात राज्य परिवहन महामंडळाच्या वाहकाने अल्पवयीन मुलीशी अश्लिल चाळे करुन अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पिडीत अल्पवयीन मुलीच्या आईने संबंधित वाहकाविरोधात महाड शहर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोषी वाहनचालकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय,
(२) होय,
(३) सदरबाबत गोरेगांव पोलीस ठाणे गु.र.नं. २८/२०१६ भादंवि कलम ३५४ (अ), लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम कलम ८,१० अन्वये दिनांक २.६.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपिविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोटफैल (जि.अकोला) परिसरातील नाल्यात एका अज्ञान व्यक्तीचा मृतदेह पोलिसांच्या हद्दीवरुन प्रश्न निर्माण झाल्याने २४ तास नाल्यातच पडून राहिल्याबाबत**

**(३७) ६०६४४ (२३-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोटफैल (जि.अकोला) परिसरातील मिटरगेज रेल्वेलाईन नजीक असलेल्या आरपीएफ पोलीस स्टेशनमागील मोठ्या नाल्यात एका अज्ञान व्यक्तीचा मृतदेह दिनांक २८ मे, २०१६ रोजी आढळून आल्या प्रकरणी रेल्वे पोलीस व अकोटफैल पोलिसांच्या हद्दीवरुन प्रश्न निर्माण झाल्याने सदर मृतदेह २४ तास नाल्यातच पडून होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार पोलिसांची ही भूमिका योग्य नसून याबाबत सदरहू हद्दीचा प्रश्न कायमचा निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याप्रकरणी रेल्वे पोलीस व अकोटफैल पोलीसांच्या हद्दीवरुन प्रश्न निर्माण झाला नसून सदर मृतदेह २४ तास नाल्यात पडून नव्हता. माहिती मिळताच अकोटफैल पोलीसांनी तात्काळ कार्यवाही केली व अकस्मात मृत्यू नोंद करुन तपास सुरु केलेला आहे. अकस्मात मृत्यूचे तपासात अनोळखी इसमाची ओळख पटविण्याकरीता शोधपत्रिका तयार करुन प्रसिध्दीस देण्यात आली आहे. अनोळखी मृतदेहाचे दफनविधी करण्याकरिता उपविभागीय दंडाधिकारी, अकोला यांचेकडून जाहीरनामा काढण्यात येवून रितरस दफनविधी करण्यात आला आहे. मृतकाचे शवविच्छेदन अहवालात मृतकाचे मृत्युचे कारण Bilateral Pulmonary Consodilation असे नमूद आहे. सदर प्रकरणी पोलीसांचे हद्दीबाबत प्रश्न निर्माण झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात दुचाकी वाहन चोरींच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(३८) ६०६५१ (२३-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात दुचाकी वाहन चोरींच्या घटनांमध्ये वाढ झाली असून वर्षभरात १९० दुचाकी चोरट्यांनी पळवल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त चोरींच्या घटनांचा तपास लावण्याकरिता कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) अकोला जिल्ह्यात सन २०१५ मध्ये १८८ दुचाकी वाहन चोरीच्या घटना घडल्याची नोंद आहे.
(२) अकोला जिल्ह्यात सन २०१५ मध्ये १८८ दुचाकी चोरीच्या घटना घडल्या होत्या त्यापैकी ५४ गुन्ह्यातील दुचाकी वाहने हस्तगत करण्यात आली आहेत व ६४ गुन्हेगारांना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केली आहेत.

तसेच अकोला जिल्ह्यात पोलीस स्टेशन मार्फत नाकाबंदीचे आयोजन करुन वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. सापळा रचून आणि गुप्त बातमीदार नेमून वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहे. दुचाकी वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्याकरीता महत्वाचे व्यावसायिक प्रतिष्ठाने, हॉस्पिटल अथवा

हॉटेल इत्यादी ठिकाणी वाहन तळाचे जागी व्यावसायिकांना सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याकरिता प्रोत्साहन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात बोगस बियाणे, खते विक्री करुन**
**शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याबाबत**

**(३९) ६१६७८ (२४-०८-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात बोगस बियाणे, खते विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याच्या अनेक घटना माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोगस बियाणे, खते विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीस अटक करुन पोलीस स्टेशन माना येथे दिनांक ११ जून, २०१६ रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर फसवणूकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे
(३) सदर प्रकरणी कृषी अधिकारी, पंचायत समिती, मुर्तिजापूर यांनी माना येथे काही लोक खत विक्री परवाना नसताना नियमबाह्य बेकायदेशीर खत विक्री करीत असल्याच्या माहितीवरुन माना येथे छापा टाकून वाहन क्रमांक MH-०८-W-२०३९ टाटा कंपनीची पिकअप व्हॅन ज्यामध्ये सेंद्रीय खत पोटॅशच्या ०९ बॅग, सेंद्रीय खत स्फुरदच्या एकूण ३१ बॅग अशा ४० खतांच्या बॅगवर मजकूर, बॅच क्रमांक, उत्पादन क्रमांक व खताचे घटक नमूद नसल्याने सदरचा माल पकडून पोलीस स्टेशन, माना जि.अकोला येथे तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन पोलीस स्टेशन ,माना जि.अकोला येथे अप.क्र. ९७/२०१६ कलम ४२०, ३४ भादंवि व खत नियंत्रण आदेश १९९५ खंड १२, ७, ५, १९ (ब) (१) २१(ब) व जीवनावश्यक अधि, १९५५ कलम ३(२)(ब), ३(ब) अन्वये ४ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक केलेली आहे. तसेच गुन्ह्यात जप्त केलेले खत हे बनावट आहे किंवा कसे, याबाबत पडताळणी करणेकरीता प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आले आहे, गुन्हा तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बार्शीटाकळी (जि.अकोला) येथील गुलामनबी महाविद्‍यालयातील प्राचार्या विरोधात गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(४०) ६२२९१ (२३-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी येथील गुलाम नबी महाविद्‍यालयातील सहाय्यक प्राध्यापिकेला शारिरीक सुखाची मागणी करणारा प्राचार्य व प्राचार्या विरोधात कारवाई न करणाऱ्या ठाणेदार, दोन पोलीसांची व विद्‍यमान ठाणेदार यांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-१०-२०१६) :** (१) होय.

(२) मा.न्यायालयाने दि. १.८.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार आरोपी क्र. १ प्राचार्य, गुलाम नबी आझाद कॉलेज, बार्शिटाकळी यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बार्शिटाकळी जि.अकोला येथे दि. ५.८.२०१६ रोजी अप.क्र.१६०/२०१६ कलम ४२०, ४०९, ४६८, ४७१ भादंवि सह कलम ३(१)(११)(१२), ३(२)(५)(६) अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्‍यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच आरोपी क्र.३, ४, ५ यांचेविरुध्द कलम ४(२) अ.जा.ज.अ.प्र. कायद्‍यानुसार प्रशासकीय चौकशी करण्याकरिता प्रकरण अपर पोलीस अधीक्षक अकोला यांचेकडे सोपविण्यात आले आहे प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**लातूर येथील शासकीय बाल सुधार गृहातून चार अल्पवयीन मुले पळाल्याबाबत**

**(४१) ६२३२५ (२४-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील लेबर कॉलनीतील शासकीय बालसुधार गृहातून चार अल्पवयीन मुले पळाली असून या संदर्भात गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चार मुलांचा शोध घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :** (१) होय,

(२) प्रस्तुत प्रकरणी बालगृह लेबर कॉलनी, लातूर चे काळजीवाहक यांनी सदर बालगृहातील चार मुलांनी पळून गेले वगैरे फिर्याद दिनांक २.५.२०१६ रोजी दिल्यावरून पोलीस स्टेशन गांधीचौक, लातूर येथे गु.र.नं. ३०६/२०१६ कलम २२४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासामध्ये पळून गेलेल्या ४ मुलांपैकी ३ मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. एक मुलगा मिळून आला नाही. त्याचा शोध घेण्यात येत आहे. सदर मिळून न आलेल्या विधीसंघर्षग्रस्त बालक विरूध्द २९९ क्रिप्रोको प्रमाणे फरार दर्शवून वरील सर्व विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या विरूध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथून नागभीड राजोलीमार्गे चंद्रपूरकडे नेत असतांना**
**देशी-विदेशी दारु जप्त करण्यात आल्याबाबत**

**(४२) ६२७३५ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथून नागभीड राजोलीमार्गे चंद्रपूरकडे नेत असतांना लाखो रुपयांची देशी-विदेशी दारु दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास जप्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) व (२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मुल हद्दीत दिनांक १८/०२/२०१६ रोजी गांधी चौक, मुल येथे नाकाबंदी करीत असताना नागपूर ते नागभीड, राजोली मुल मार्ग चंद्रपूर कडे जाणाऱ्या क्लासिक वाहनांमध्ये विदेशी दारु व देशी दारु ची अवैधरित्या वाहूक करताना निदर्शनास आल्याने २ आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन मुल येथे अप क्र. ९३/२०१६ कलम ६५(ई), ८३ मुंबई दारुबंदी कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आली आहे तर दुसऱ्या आरोपीस अटक करणे बाकी आहे. गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भद्रावतीच्या (जि.चंद्रपूर) येथील ८ दुकाने तोडण्यात आल्याबाबत**

**(४३) ६२७४३ (२३-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावतीच्या (जि.चंद्रपूर) येथील नगर मार्केट मधील ४ व विजासन वार्डातील ४ अशी एकूण ८ दुकाने दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास तोडण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

भद्रावती येथील नगर मार्केट मधील ४ दुकानात चोरी झालेली आहे. तथापि विजासन वार्डातील ४ दुकानात झालेल्या चोरीबाबत पोलीस स्टेशनला तक्रार प्राप्त नाही.

(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, भद्रावती जि.चंद्रपूर येथे दोन आरोपीविरुध्द अप.क्र. ३०३/२०१६ कलम ४५७, ३८० भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक करुन आरोपींकडून रुपये ५,६००/- जप्त करण्यात आले. सदर गुन्ह्यातील आरोपी यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगांव (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथील शेतशिवारातून देशी दारुचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत

**(४४) ६२७५४ (२३-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथील शेतशिवारातून मूल पोलिसांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास साडेतीन लाख रुपयांचा देशी दारुचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे. तथापि सदरची घटना दिनांक ११/४/२०१६ रोजीची नसून दिनांक ७/५/२०१६ रोजीची आहे.

(२) पोलीस स्टेशन मुल हद्दीतील मौजा नांदगाव शिवारातील शेतात मिळालेल्या माहितीवरुन छापा टाकला असता शेतात रु. ३,५०,०००/- ची देशी दारु व १ आयसर मिनीडोर ट्रक किंमत रु. ४,५०,०००/- असा कूण ८,००,०००/- किंमतीचा माल अवैधरित्या मिळून आल्याने पोलीस स्टेशन मूल येथे अप.क्र. २५५/२०१६ कलम ६५(ई), ८२, ८३ मुंबई दारुबंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील ५ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील श्री विठ्ठल मंदीर स्थायी समितवरील सदस्यांच्या नियुक्त्या करणेबाबत

**(४५) ६३६३४ (२४-०८-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिर्थक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) येथील श्री विठ्ठल मंदीर स्थायी समितीवरील सदस्याची नियुक्ती प्रलंबित असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नियुक्त्या अभावी धोरणात्मक निर्णय घेता येत नसल्याने मंदिर समितीच्या कामकाजावर परिणाम झाला असून भाविकांसाठी करण्यात येणारी अनेक विकास कामे खोळंबलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीवर सदस्यांच्या नियुक्त्या करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही,

पंढरपूर मंदिर अधिनियम १९७३ कलम २१ च्या पोटकलम (२) अनुसार स्थायी स्वरूपात समिती स्थापन होईपर्यंतच्या कालावधीसाठी विभागाच्या दिनांक ११.०६.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली व्दिसदस्यीय अस्थायी समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीद्वारे भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी महत्वाची कामे करण्यात आली आहेत.
(३) शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी (जि.यवतमाळ) शहरामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेअंतर्गत बांधण्यात येणा-या शौचालयाच्या अनुदानाचा केलेल्या अपहाराबाबत**

**(४६) ६३९७१ (२३-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) शहरातील शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेअंतर्गत बांधण्यात येणारी शौचालये न बांधता शासकीय अनुदानाचा अपहार केल्याच्या आरोपावरुन १४ जणांविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधीताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी १४ व्यक्तीविरुध्द पोलीस स्टेशन वणी येथे गु.र.क्र. ४९३/१६ कलम ४०६ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासात असे आढळून आले की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वणी शहरातील १४ व्यक्तींना नगर परिषद, वणी कडून वैयक्तिक शौचालक मंजूर करुन नगर परिषद, वणीच्या वतीने प्रत्येकी ६ हजार रुपये अनुदार मंजूर करुन त्यांना बॅकेमार्फत अनुदान अदा करण्यात आले. सदर १४ व्यक्तींनी दिलेल्या हमीपत्रानुसार त्यांना अनुदान मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम सुरू करणे अपेक्षित होते. परंतु ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटूनही तसेच त्यांना नगरपरिषदेकडून नोटीस देवून सुध्दा अनुदान प्राप्त झालेल्या १४ व्यक्तींनी शौचालयाचे बांधकामची सुरुवात केली नाही व शासकीय रकमेची अफरातफर केली. सदर १४ व्यक्तींविरुध्द पुरावे आढळून आल्याने त्यांना अटके शिवाय सुचनापत्र देण्यात आले आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरपूर (ता.वणी जि.यवतमाळ) येथी पोलीसांनी आदिलाबादकडे कत्तलीसाठी जाणारी जनावरे ताब्यात घेऊन सात जणांना अटक केल्याबाबत**

**(४७) ६३९८० (२३-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरपूर (ता.वणी जि.यवतमाळ) येथील पोलीसांनी दोन वाहनांतून आदिलाबादकडे कत्तलीसाठी जाणारी ५८ जनावरे ताब्यात घेऊन सात जणांना अटक केल्याचे माहे जून २०१६ मधे वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात गोहत्या बंदी कायदा लागू असतांनाही आदिलाबादकडे दररोज कत्तलीसाठी जनावरे जात असल्याने याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जनावरांच्या अवैध वाहतूकीस आळा घालण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यात ९ ठिकाणी नाकाबंदी चेकींग पॉईट लावून वाहनांची तपासणी कार्यवाही करण्यात येत आहे यवतमाळ जिल्ह्यात अवैध वाहतूकीसंदर्भात प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांना सरंक्षण अधिनियम व प्रण्यांना निदर्यतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम अन्वये सन २०१४ ते ऑगस्ट, २०१६ अखेर एकूण ८७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील होमगार्ड पुन:नोंदणीच्या आदेशामुळे हजारो होमगार्ड बेराजगार होणार असल्याबाबत**

**(४८) ६४१३५ (२३-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होमगार्ड कार्यरत असतांना त्यांना १२ वर्षे कालावधी पुर्ण झाल्याने सेवेतून कमी करणे व पुन:नोंदणीच्या आदेशामुळे हजारो होमगार्ड बेरोजगार होवून त्यांच्या कुटूबियांवर उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाल्याने उपासमारीची वेळ येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशातील जाचक अटी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय निवासस्थानांचा तपसील मिळणेबाबत**

**(४९) ६४२६८ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत शासकीय कर्मचा-यांना शासकीय निवासस्थान मिळण्याकरीता दिनांक ३० डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये ऑन लाईन अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५ पासून ते अद्यापपर्यंत शासनाकडे शासकीय निवासस्थान मिळण्याकरीता किती अर्ज प्राप्त झाले आहेत व माहे डिसेंबर, २०१४ पुर्वीचे किती अर्ज प्रलंबित आहेत,

(३) तसेच किती अर्जदारांच्या अर्जाची छाननी करण्यात आली व किती जणांना प्रतिक्षा यादीत समाविष्ट करण्यात आले असून शासनाकडे एकूण किती शासकीय निवासस्थाने आहेत आणि त्यापैकी दुरुस्ती, रिक्त व भरलेली निवासस्थाने किती आहेत,
(४) तसेच एकूण शासकीय निवासस्थानात सेवानिवृत्त झालेल्या किती कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत शासकीय निवासस्थाने सोडलेली नाही ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :** (१) दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील बृहन्मुंबईतील शासकीय निवासस्थान मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे.
(२) जानेवारी, २०१५ ते ३१ ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत १९९४ ऑन लाईन प्रणालीद्वारे अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच डिसेंबर, २०१४ पूर्वीचे १६६१ अर्ज प्रलंबित आहेत.
(३) आतापर्यंत प्राप्त झालेल्या २८५५ अर्जदारांच्या अर्जाची छाननी करण्यात आली असून त्यापैकी ११४८ अर्जदारांना प्रतिक्षा यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. बृहन्मुंबईत शासनाकडे ५८६० निवासस्थाने आहेत त्यापैकी ५७२३ निवासस्थाने भरलेली आहेत. तसेच १२० निवासस्थाने दुरूस्तीकरिता असून वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांकरिता असलेल्या निवासस्थानांपैकी १७ निवासस्थाने रिक्त आहेत.
(४) सेवानिवृत्त झालेल्या ४० अधिकारी / कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थाने रिक्त केलेली नाहीत.

---

**बुलडाणा येथे वत्तपत्रांना दिल्या जाणा-या जाहिरातींच्या धोरणात सुसुत्रता आणणेबाबत.**

**(५०) ६४३०० (२३-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा येथे वृत्तपत्रांना दिल्या जाणा-या जाहिरातींच्या धोरणात सुसुत्रता आणण्याच्या मागणीसाठी जिल्हा पत्रकार संघासह सर्व पत्रकार संघटनाच्या वतीने दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी निदर्शने करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) जाहिराती वितरीत करतांना त्या त्या वर्गातील वृत्तपत्रांमध्ये करावयाच्या समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा अवलंब करण्यात येतो. शासनाच्या इतर विभागाकडून येणाऱ्या जाहिराती या त्या विभागाच्या विनंतीनुसार राज्य स्तरावरील अ व ब वर्गातील वर्तमानपत्रामधून दिल्या जातात. त्या क वर्गाच्या वृत्तपत्रामधून देणे शक्य नाही.

पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंधक करण्यासाठी करावयाच्या कायद्याचे प्रारूप तयार करण्यात आले असून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

पत्रकारांना निवृत्ती वेतन देण्यासंदर्भातील विविध पर्यायांची पडताळणी करण्यांत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.